# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 11 March 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – ११ मार्च २०२४ सायंकाळी ६.१०

****

- महिला सबलीकरणाच्या माध्यमातूनच देशाची प्रगतीपथावर वाटचाल, पंतप्रधान नरेंद्र मोदी, पंतप्रधानांच्या हस्ते एक हजार नमो दीदींना ड्रोन वाटप
- लातूरच्या रेल्वे बोगी निर्मिती कारखान्यासह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रेल्वेशी निगडित ८५ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं उद्या लोकार्पण आणि उद्‌घाटन

आणि

- शासकीय कागदपत्रांवर आईचं नाव बंधनकारक करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

****

भारतानं आज मिशन दिव्यास्त्र- या अग्नी-५ क्षेपणास्त्राची पहिली उडाण चाचणी घेतली. स्वदेशी तंत्रज्ञानानं निर्माण केलेल्या मल्टीपल इन्डीपेन्डन्टली टार्गेटेबल रि-एन्ट्री व्हेईकल तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ही चाचणी घेण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या यशाबद्दल डीआरडीओच्या शास्त्रज्ञांचं अभिनंदन केलं आहे.

****

महिला सबलीकरणाच्या माध्यमातूनच कोणताही देश प्रगतीपथावर वाटचाल करतो, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. पंतप्रधान आज नवी दिल्ली इथं आयोजित सशक्त नारी-विकसित भारत कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमादरम्यान पंतप्रधानांच्या हस्ते एक हजार नमो ड्रोन दीदीजना ड्रोन देण्यात आले. सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून एक कोटींपेक्षा अधिक महिला लखपती दीदी झाल्याचं पंतप्रधान म्हणाले. पंतप्रधानांनी बचत

गटांना पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीसाठी पुढाकार घेण्याचं आवाहन केलं. महिला बचत गटांनी ग्रामीण पायाभूत विकासात आणि एकूणच ग्रामीण विकासात मोलाचं योगदान दिल्याचं पंतप्रधान म्हणाले. गेल्या दहा वर्षात बचत गटांचा केवळ विस्तारच झाला नाही तर ९८ टक्के बचत गटांची बँक खाते उघडण्यात आल्याची माहिती पंतप्रधानांनी दिली.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या, राज्यातल्या रेल्वेशी निगडित ८५ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं लोकार्पण तसंच उद्‌घाटन होणार आहे. यामध्ये लातूर इथला रेल्वे बोगीबांधणी कारखाना, नांदेड रेल्वे विभागातील दिनेगाव, जालना येथील ड्राय पोर्ट, अमलाखुर्द ते खंडवा गेज परिवर्तन तसेच आदिलाबाद, नांदेड, परभणी, औरंगाबाद, नगरसोल, हिंगोली आणि वाशिम रेल्वे स्थानकावरील एक स्थानक-एक उत्पादन या स्टॉल्सचा समावेश आहे. यासह बडनेरा इथल्या रेल्वे बोगी दुरुस्ती कार्यशाळा, पुण्यातली वंदे भारत कोच देखभाल दुरुस्ती कार्यशाळा, रेल्वे स्थानकावरची जनऔषधी केंद्रांचाही यात समावेश आहे. पंतप्रधान दहा वंदे भारत रेल्वेंना दूरदृश्य यंत्रणेच्या माध्यमातून हिरवा झेंडा दाखवणार आहेत. लातूरचा रेल्वे बोगी कारखाना महाराष्ट्रातला पहिला आणि देशातला चौथा कारखाना आहे. या कारखान्यातून रेल्वे बोगीसह मेट्रो रेल्वेचे कोच तसंच वंदेभारत रेल्वेचे कोच यांची निर्मिती केली जाणार आहे.

****

भारतीय स्टेट बँकेने, उद्या, १२ मार्च रोजीपर्यंत निवडणूक आयोगाला निवडणूक रोख्यांची माहिती उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने आज दिले. सर्वोच्च न्यायालयाने १५ फेब्रुवारी रोजी निवडणूक रोखे योजना रद्द करण्याचे आदेश देत यासंदर्भातील रोख्यांची माहिती निवडणूक आयोगाला १३ मार्चपर्यंत जाहीर करण्यास सांगितले होते. परंतु, निवडणूक रोख्यांची माहिती देण्यासाठी ३० जूनपर्यंत वेळ द्यावा अशी मागणी एसबीआयने सर्वोच्च न्यायालयाकडे केली होती. त्यासंदर्भातील याचिका सर्वोच्च न्यायालयाने आज फेटाळली. तसेच निवडणूक आयोगाने १५ मार्चपर्यंत ही सर्व माहिती संकेतस्थळावर अद्ययावत करावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले.

****

शासकीय कागदपत्रांवर आता आईचं नाव बंधनकारक करण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यासह बीडीडी गाळेधारक आणि झोपडीधारक यांच्या करारनाम्यावर लागणारे मुद्रांक शुल्क कमी करण्याचा निर्णयही आज घेण्यात आला. तसेच बंद पडलेल्या ५८ गिरण्यांमधील कामगारांना घरकुल देणे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र उभारणे, वस्तू आणि सेवा कर विभाग म्हणजेच जीएसटीमध्ये नवीन ५२२ पदांना मान्यता देणे, विधि आणि न्याय विभागाच्या कार्यालयांसाठी नवीन इमारतीची राज्यस्तरीय योजना राबवणे, अयोध्येला महाराष्ट्र अतिथीगृहासाठी बांधकामासाठी भूखंड खरेदी हे निर्णयही घेण्यात आले. याशिवाय राज्याच्या तृतीयपंथी धोरण २०२४ ला मान्यता देणे, राज्यातील जिल्ह्यांच्या विकासासाठी संस्थात्मक क्षमता सक्षमीकरण प्रकल्प उभारणे, उपसा जलसिंचन योजनेच्या ग्राहकांना वीज दरात सवलत योजनेला मुदतवाढ देण्याचा निर्णयही मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला.

****

मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाच्या वरळी ते मरीन ड्राईव्ह या दक्षिणवाहिनी मार्गिकेचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज लोकार्पण करण्यात आले. मुंबई किनारी रस्त्याला धर्मवीर स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचं नाव देण्यात आलं आहे. नरिमन पॉइंटपासून दहिसर-विरारपर्यंत वेगाने पोहोचण्यासाठी मुंबई किनारी रस्ता प्रकल्प हाती घेतला आहे. त्यातला पहिला टप्पा म्हणजे मुंबईच्या दक्षिणेला प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपूल ते वरळी-वांद्रे सागरी सेतूच्या वरळी टोकापर्यंतचा मार्ग म्हणजेच मुंबई किनारी रस्ता प्रकल्प होय.

****

राज्यातील पर्यायी बाजार व्यवस्था तसंच कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा अभ्यास करण्यासाठी गठीत केलेल्या माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट अभ्यासगटाच्या शिफारशी शासनास सादर करण्यात आल्या. किमान आधारभूत किंमतीबाबत, राज्यातील कृषि पणन विभागाचे बळकटीकरण आणि पुरेशी अर्थसंकल्पीय तरतूद करणं, राज्यातील कृषि पणन व्यवस्थेत भविष्याचा वेध घेणे, या महत्त्वाच्या शिफारशी शेतकरी हित केंद्रबिंदू मानून अभ्यासगटाने सादर केल्या आहेत.

****

काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा उद्या दुपारी नंदूरबार जिल्ह्यातून महाराष्ट्रात प्रवेश करणार आहे. त्यानंतर १३ मार्चला धुळे- मालेगाव, १४ मार्चला नाशिक, १५ मार्चला पालघर- ठाणे असा प्रवास करत ही यात्रा १६ मार्चला मुंबईत दाखल होणार आहे. १७ मार्चला भारत जोडो न्याय यात्रेचा समारोप मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर होणार आहे. याठिकाणीच इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचे रणशिंग फुंकले जाणार आहे.

****

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगरच्या प्रादेशिक वृत्तविभागात, कंत्राटी तत्वावर अर्धवेळ वार्ताहर नियुक्त करण्यासाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. शैक्षणिक पात्रता, अनुभव, वय या अर्हतेसाठी इच्छुकांनी newsonair.gov.in/vacancies या संकेतस्थळाला भेट द्यावी. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज येत्या १४ मार्चपर्यंत सी एस एन आर एन यू डॉट ए डी एम एन अॅट जीमेल डॉट कॉम या ईमेलवर, किंवा, कार्यालय प्रमुख, प्रादेशिक वृत्त विभाग- आकाशवाणी, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर, या पत्यावर पाठवावेत.

****

नवमतदारांसाठी, मेरा पहला वोट देश के लिए, हे मतदार जागरूकता अभियान सरकारने सुरु केलं आहे. अर्थतज्ज्ञ, लेखक आणि अभिनेते दीपक करंजीकर यांनी नवमतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.

****

आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यात प्रशासकीय तयारीचा आढावा घेतला जात आहे. जिल्ह्यातील मतदान केंद्रांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत यांच्यासह पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी भेट देऊन मतदान केंद्रांवरील परिस्थितीचा आढावा घेतला. जिल्हाधिकाऱ्यांनी लोहा येथील स्ट्राँग रूमची पाहणी केली. तसंच जिल्हा परिषद हायस्कूल लोहा येथील पाच मतदान केंद्रांची पाहणी करून केंद्रावर आवश्यक सुविधा पुरविण्याबाबत निर्देश दिले.

****

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ –सीबीएसईनं इयत्ता दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली आहे. सीबीएसईने वारंवार स्मरणपत्र देऊनही काही शाळांनी प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्पाची कामे, आंतरिक मुल्यांकन, आंतरिक ग्रेड कालमर्यादेत पूर्ण केले नसल्याचे निदर्शनास आले आहे. काही शाळांनी मुदत वाढवून देण्याची वारंवार विनंती केल्यानंतर मुदतवाढीचा निर्णय घेण्यात आल्याचं मंडळातर्फे सांगण्यात आलं आहे.

****

विद्यार्थ्यांनी अभ्यासासह क्रीडा संस्कृतीच्या माध्यमातून समाज आणि देशासाठी महत्त्वपूर्ण योगदान द्यावे अशी अपेक्षा कुलपती तथा राज्यपाल रमेश बैस यांनी व्यक्त केली आहे. छत्रपती संभाजीनगर इथल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात राज्यस्तरीय इंद्रधनुष युवा महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी दूरदृश्य प्रणाली द्वारे बैस यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यापीठाच्या नाट्य सभागृहात पार पडलेल्या उद्घाटन सोहळ्याला विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर विजय फुलारी, छत्रपती संभाजी नगरचे पोलीस आयुक्त मनोज लोहिया यांची उपस्थिती होती.

****